# भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील महाराष्ट्रातील कर्तुत्वान स्त्रिया

**Mr.Shahid Mustak Mulla** Asst.Prof. Department of Political Science, Yashwantrao Chavan Law College,Karad.

**सारांश-**:

प्रस्तुत शोधनिबंधामध्ये महाराष्ट्रातील ज्या स्त्रियांचा भारतीय स्वातंत्र्य आंदोलनामध्ये सहभाग होता या स्त्रियांच्या कार्याची दखल घेण्याचा प्रयत्न यामध्ये करण्यात आला आहे. प्रामुख्याने काशीताई कानिटकर, यमुनाताई भावे उर्फ रुक्मिणी ताई बापट, लीला पाटील, अनुसया काळे यासारख्या महिलांनी भारतीय स्वातंत्र्य लढ्यामध्ये जे योगदान दिलेले आहे. त्यावर प्रकाश टाकण्याचा हा अल्पसा प्रयत्न. राष्ट्राची भूमी ही क्रांतिकारकांची, संतांची म्हणून ओळखली जाते. तरीदेखील भारतीय स्वातंत्र्य आंदोलनामध्ये ज्या महिलांनी योगदान दिलेले आहे. त्या प्रकाश झोतात आलेल्या नाही किंबहुना त्या दुर्लक्षित राहिलेल्या आहेत. त्यामुळे प्रस्तुत शोधनिबंधामध्ये या महाराष्ट्रातील कर्तुत्वान स्वातंत्र्य सैनानी स्त्रियांचा व त्यांच्या कार्याचा अभ्यास करण्यात आला आहे.

**प्रस्तावना-:**

भारतीय स्वातंत्र्यलढा हा शूरवीरांच्या कर्तबगारीचा लढा म्हणून ओळखला जातो. या स्वातंत्र्य लढ्यामध्ये फक्त पुरुषांचा सहभाग होता असे नाही तर महिलांचा देखील यामध्ये सहभाग होता. स्वातंत्र्य चळवळ ही सर्वसमावेशक चळवळ होती. भारताला गुलामगिरीच्या पाशातून मुक्त करण्यासाठी समाजातील सर्व घटकांनी स्वातंत्र्य आंदोलनामध्ये सहभाग नोंदविला होता. फक्त उच्चवर्गीय कुटुंबातीलच महिलांनी स्वातंत्र्य आंदोलनात सहभाग नोंदवला असे नाही तर समाजातील सर्व स्तरातील महिलांनी देखील स्वातंत्र्य आंदोलनात सहभाग नोंदविला. प्राचीन मध्ययुगीन व आधुनिक काळात जो इतिहास घडला आणि जो आपल्यापुढे मांडला गेला आहे त्यामध्ये प्रामुख्याने बहुतांशी पुरुषांच्या कर्तबदारीवरच प्रकाश टाकण्याचा प्रयत्न झाला आहे. समाजकारण, अर्थकारण, प्रशासन, राजकारण या वेगवेगळ्या क्षेत्रातील पुरुषांचे कर्तृत्व प्रकाशात आणले गेले. भारतीय इतिहासात स्त्री ही केवळ 'चूल आणि मूल' या दुष्ट चक्रामध्ये अडकविली गेली. तर सार्वजनिक क्षेत्रातील तिच्या कर्तुत्वाला मज्जाव केला. असे बऱ्याचदा पहावयास मिळते. याचाच अर्थ या काळामध्ये स्त्री हा घटक संपूर्णतः दुर्लक्षित राहिलेला आहे असे जाणवते. कुटुंबा पलीकडे जाऊन शिक्षण घेणे, समाजकारण करणे, उद्योग व्यवसाय करणे, राजकारणात भाग घेणे,प्रशासनात उच्चपदे भूषविणे इत्यादी बाबतीत स्त्रीला वावच नव्हता.

भारत देश हा मूळचा स्त्री हुतात्म्यांचा देश होता प्राचीन काळात स्त्रीला हवे असणारे स्वातंत्र्य ही होते भारतात अनेक सित्तांतले झाली ही स्थित्यंतरे सामाजिक राजकीय सिद्धार्मिक या चळवळीतून झालेली आहे विशेषतः स्त्री जीवनाचा विचार करतानाही राजकीय स्थित्यंतरांचा विचार करावाच लागतो. भारत हा दैववादी आणि संकुचित मानसिक प्रवृत्तीचा प्रतिनिधित्व करणारा देश बनला. भारतीय संस्कृतीत वैदिक काळामध्ये स्त्रियांना प्रतिष्ठा होती. धर्मकारण, राजकारण आणि समाजकारण या सर्वात तिला पुरुषा इतकेच प्राधान्य होते. मनुस्मृतीमध्ये मनुच्या भूमिका विषम दिसून येतात.

मध्ययुगीन काळामध्ये धर्माधितेचे महत्त्व अधिक वाढल्यामुळे जातीभेद वर्णभेद यांच्या चरम सीमेला समाज पोहोचला होता आणि या काळात घराला पडदा , विधवा विवाह निषेध यामुळे स्त्रीच्या जीवनाची कुचुंबना अधिकच भयावह झाली होती. मध्ययुगीन काळ हा स्त्रियांच्या दृष्टीने अतिशय शूद्र असा काळ आहे शूद्रांपेक्षाही वाईट जीवन या काळात स्त्रियांच्या वाट्याला आले होते. या काळामध्ये स्त्री ही वेगवेगळ्या रूपाने सगळ्यांची दासी झाली. व्यापारा निमित्त भारतात आलेल्या इंग्रजांनी कालांतराने भारतावर आपले अधिराज्य प्रस्थापित केले १८१८ मध्ये पेशवाई संपुष्टात आली आणि इंग्रजांनी भारतावर आपले संपूर्ण साम्राज्य स्थापित केले. एकोणिसाव्या शतकापर्यंत मुलींना नोकरी न करता पुढे संसारच करावयाचा आहे त्यामुळे त्यांना संसार उपयोगी शिक्षण दिले पाहिजे असे विचारसरणी समाजाची होती. त्यानुसार अभ्यासक्रमात बदल झाला त्यामुळे तत्कालीन परिस्थितीत पंडिता रमाबाई, न्यायमूर्ती रानडे, काशीबाई कानिटकर यांनी स्त्री शिक्षणाला प्रोत्साहन दिले व येथूनच खऱ्या अर्थाने स्त्रियांच्या उत्कर्षाचा प्रारंभ झाला. पुढे टिळक युगाचा शेवट व गांधीयुगाचा आरंभ या पार्श्वभूमीवर अनेक सुधारणा झालेल्या होत्या महिलांनी विविध क्षेत्रात पदार्पण करण्यास प्रारंभ केला होता यामध्ये स्त्रिया मोठ्या प्रमाणात राजकीय स्वातंत्र्यलढ्यात सहभाग होऊ लागल्या.

इ.स. १५ ऑगस्ट १९४७ नंतर भारत सार्वभौम राष्ट्र म्हणून जगाच्या नकाशावर मानाचे स्थान अधोरेखीत केले. १८८५ ते १९४७ हा भारतीय स्वातंत्र्य चळवळीचा गौरवशाली कालखंड म्हणून उल्लेखावा लागतो. प्रदीर्घ सांस्कृतिक परंपरा लाभलेला, वैविध्यातूनही एकता शोधणारा विस्तीर्ण अज्ञान, दारिद्र्य, विषमता यामुळे पोखरलेला असुनही चिवटपणे ब्रिटीशांना अहिंसात्मक मार्गाने आव्हान देणारा भारत हा देश जगातील एकमेव उदाहरण आहे. भारतीय स्वातंत्र्य चळवळ ही

सर्वात मोठी चळवळ होती. त्यात लाखो स्त्री पुरुषांनी सहभाग घेतला. जात-पात, उच्च- निचता विसरुन एकत्र आले. त्यामुळे साम्राज्यवादी ब्रिटिश सत्तेला माघार घेणे भाग पडले. यात पुरुषा प्रमाणे भारतातील सर्वच भागातून स्त्रीयांनी आपला सहभाग नोंदविला त्यातही महाराष्ट्रातील स्त्रीयाही कुठेही कमी नव्हत्या त्यांचे मोलाचे योगदानही या लढयात लक्षणीय ठरले. म्हणूनच त्यांच्या कार्यावर प्रकाश टाकणे गरजेचे वाटते.

**उद्दिष्टे-:**

- लिंग भाव समानतेच्यात्वानुसार पुरुषांच्या बरोबरीने स्त्रियांचा देखील स्वातंत्र्य आंदोलनात सहभाग होता हे सिद्ध करणे
- भारतीय स्वातंत्र्य आंदोलनातील महाराष्ट्रातील स्त्रियांच्या योगदानाचा अभ्यास करणे.
- भारतीय स्वातंत्र्य आंदोलनातील स्त्रियांची भूमिका अभ्यासणे.
- भारतीय स्वातंत्र्य आंदोलनातील दुर्लक्षित महिलांच्या कार्यावर प्रकाश टाकणे.

**विषय प्रवेश-:**

कोणताही इतिहास घडताना तो घडविण्यासाठी केवळ पुरुषांचेच हात कारणीभूत असतात असे नाही. तर बालपणापासून ते तारुण्यपर्यंत पुरुषांना घडविणारे मातेचे हात तिची माया तिने मुलांवर केलेले संस्कार त्यांच्यामध्ये निर्माण केलेला विश्वास इत्यादी अनेक घटनांमुळे कर्तबगार पुरुष निर्माण झाले आहेत. पण असे पुरुष निर्माण केलेल्या माता भगिनींना, खियांना मात्र दुर्लक्षित केले जाते असे मानले जाते की, प्रत्येक यशस्वी पुरुषामागे एक स्त्री असते. तर स्त्रीवादी दृष्टिकोनातून इतिहासाचे पुनर्लेखन होणे आवश्यक वाटते. स्वातंत्र्यप्राप्तीसाठी जी जन आंदोलने झाली त्या प्रत्येक टप्प्यात स्त्रियांनी प्रत्यक्ष तसेच अप्रत्यक्ष सहभाग घेतला, स्वातंत्र्य चळवळीत ज्या ज्या स्त्रियांचे योगदान लाभले त्यापैकी काशीताई कानिटकर, यमुनाताई भावे, लीला उत्तम पाटील, व अनुसया काळे या महिलांनी स्वातंत्र्य आंदोलनात दिलेले योगदान पुढीलप्रमाणे-:

काशीताई कानिटकर-:आधुनिक मराठी साहित्यातील आद्य लेखिका काशीबाई कानिटकर यांचा जन्मदिन. कादंबरी,चरित्र,कथा या साहित्य प्रकाराचे लेखन करणाऱ्या त्या पहिल्या महिला. काशीबाई कानिटकर यांचा जन्म २० जानेवारी इ.स. १८६१ सांगलीच्या अष्टे गावात झाला. मृत्यू इ.स. १९४८ मध्ये झाला.'मनोरंजन' आणि 'निबंधचंद्रिका' नियतकालिकात त्यांनी सुरुवातीला लेखन केले. 'शेवट तर गोड झाला' हा त्यांचा पहिला कथासंग्रह. काशीबाईंचा जन्म महाराष्ट्रातल्या सांगली जिल्ह्यातील अष्टे गावी झाला. न्यायालयीन पेशात असलेल्या व स्वतः व्यासंगी लेखक असलेल्या गोविंद वासुदेव कानिटकरांसोबत वयाच्या नवव्या वर्षी त्यांचा विवाह झाला. गोविंदरावांनी काशीबाईंना घरीच मराठी, संस्कृत, इंग्रजी भाषा शिकवल्या.काशीबाई बनारस हिंदू विश्वविद्यालयात मराठी भाषाविषय शिकवीत असत. पहिल्या भारतीय स्त्री डॉक्टर आनंदीबाई गोपाळराव जोशी यांच्या मृत्यूनंतर त्यांचे चरित्र काशीबाई कानिटकर यांनी लिहिले.

काशीबाई इ.स. १९१० च्या भारतीय राष्ट्रीय सभेच्या अधिवेशनास हजर होत्या. काशीबाई कानिटकर (इ.स. १८६१ – इ.स. १९४८) या मराठी भाषेतील लेखिका व स्त्रीवादी समाजसुधारक होत्या. मराठी समाजात व स्थूलमानाने भारतीय समाजात स्त्रियांवर होणाऱ्या अन्यायाविषयी त्यांनी आपल्या साहित्याद्वारे आवाज उठवला. काँग्रेसची स्थापना १८८५ मध्ये झाली यात सुरुवातीच्या काळात काँग्रेस पक्षावर गोपाळकृष्ण गोखले, दादाभाई नौरोजी यासारख्या मवाळवादी नेत्याचे वर्चस्व होते. काँग्रेसच्या सुरुवातीच्या काळात या पक्षात स्त्रियांचा सहभाग हा नगण्य होता. तरी ज्या काळातील काही गणमान्य स्त्रियांनी सामाजिक, विषमतेपोटी यात याला काही प्रमाणात विरोध करण्यासाठी यात सहभाग दर्शविला. यात सुरुवातीच्या काळात या क्षेत्रातील काशीताई कानिटकर यांची कामगिरी महत्त्वाची अशी आहे.भारतीय स्वातंत्र्य लढयातील महाराष्ट्रातील मवाळगटवादी स्त्री असा त्यांचा उल्लेख केला जातो.

यमुनाताई भावे उर्फ रुक्मीणीताई बापट -:१९०५ ते १९२० या काळात आपणाला जहालमतांच्या नेत्याचा प्रभाव काँग्रेस पक्षावर दिसून येतो. या काळात लोकमान्य टिळक, पिनचंद्र पाल व लाला लचपत राय यांचे या काळात या पक्षावर वर्चस्व होते. या काळात महाराष्ट्रातील अतिशय कमी स्त्रियांनी या पक्षाच्या कार्यात सहभाग नोंदविला. कारण जहालमत हे बऱ्याचदा पुरुषीपणात जास्त असतो. तो स्त्रियात नसलयाने त्यांनी यात आपली नापसंती दर्शविली. तरी सुध्दा काही जहालमतवादी स्त्रिया आपणाला पहायला मिळतात त्यातल्याच यमुनाताई भावे उर्फ रुक्मीणीताई बापट यांनी भारतीय स्वातंत्र्य लढ्यात बहुमोल असे योगदान दिलेले आहे ब्रिटिशांच्या संधी साधूपणाच्या धोरणावर त्यांनी कडाडून टीका केली रुक्मिणी ताई बापट यांनी स्वातंत्र्य आंदोलनामध्ये जनजागृतीचे कार्य केले प्रभात फेऱ्या, शासनाविरोधात निदर्शने, परकीय

मालाचा बहिष्कार या मार्गाने स्वातंत्र्य आंदोलनात जन्मत जागृत करण्याचे कार्य केले. त्यामुळे त्यांनाभारतीय स्वातंत्र्य लढयातील महाराष्ट्रातील जहालगटवादी स्त्री म्हणून ओळखले जाते.

लीलाताई पाटील-: यांचा जन्म १५ मार्च १९२२रोजी नाशिक जिल्ह्यातील साकोरा या खेड्यात एका सुखस्थ कुटुंबात झाला. वयाच्या सोळाव्या वर्षी त्यांचा विवाह धुळे येथील उत्तमराव पाटील यांच्याशी झाला. विवाह दरम्यानच्या घडामोडींमुळे लीला ताईच्या आयुष्यात पुरोगामी सामाजिक विचारांचे बीजारोपण झाले. लीलाताई पाटील यांचे संपूर्ण कुटुंब स्वातंत्र्य चळवळीसाठी बलिदानाच्या वेदिवर उभे असल्याचे आपल्याला दिसते. त्यांच्या वयोवृद्ध सासूबाई स्वातंत्र्यलढ्यात तुरुंगात गेल्या तेथेच त्यांचे निधन झाले. दिरांना ही अटक झाली. पती डॉक्टर उत्तमराव पाटील यांचे भारत छोडो आंदोलनातील व प्रतिसरकार म्हणजे क्रांतिसिंह नाना पाटील यांचे पत्री सरकार चळवळीतील आंदोलन स्वातंत्र्यलढ्यात सुवर्ण अक्षराने लिहून ठेवण्याजोगे विलक्षण आहे लीला ताईचे दोन्ही धाकटे दीर शिवाजीराव पाटील व दशरथराव पाटील स्वातंत्र्य लढ्यातील त्यांच्या त्यांच्या आंदोलनामुळे तुरुंगात होते. शिवाजीराव पाटील म्हणजे महाराष्ट्राचे माजी मंत्री व अभिनय सम्राज्ञी स्मिता पाटील यांचे पिता. तसेच लीलाताई पाटील यांचे वडील मामी सासरे सखे मामा अशी जवळपास सर्वजण स्वातंत्र्य लढ्यामध्ये सहभागी असल्याचे दिसते त्यातूनच त्यांना स्वातंत्र्यलढ्यात सहभागी होण्याची प्रेरणा मिळाली असल्याचे दिसते. महात्मा गांधीजींच्या प्रेरणेने १९४० च्या वैयक्तिक सत्याग्रहातील सहभागामुळे त्यांना अटक झाली. अमळनेर येथील शासकीय इमारती न्यायालय पोस्ट ऑफिस रेल्वे स्टेशन जाळण्यामध्ये लीलाने पुढाकार घेतला त्यांच्या नेतृत्वाखाली सर्व कार्यक्रम यशस्वी पार पडले. १९४२ च्या छोडो भारत आंदोलनाच्या वेळी लीला ताई ह्या पाच महिन्याच्या गर्भवती होत्या. त्यावेळी अशा परिस्थितीमध्ये देखील त्यांनी स्वातंत्र्य आंदोलनात उडी घेतली. मार्शल लॉ चा भंग करण्यासाठी देखील लीलाताई आणि त्यांच्या सहकारी मैत्रिणी व त्यांचे दीर दशरथराव यांनी आंदोलन उभे केले. ऑगस्ट क्रांती जिंदाबाद इंग्रज राज मुर्दाबाद! अशा घोषणा देत त्यांनी तिरंगा झेंडा आपल्या छातीवर पोटाशी कवटाळला होता तो ताब्यात घेण्यासाठी पोलिसांनी त्यांच्या पाठीवर लाठी चार्ज केला. लीलाताई तिरंगा सोडत नाहीत हे पाहून ब्रिटिश शिपायांनी लीला ताईंच्या कमरेवर पोटावर रायफलच्या दस्त्याने वार केले. परफटक नेहून तुरुंगात दामले या अमानुष मारहाणीतच त्यांचा गर्भपात झाला. भारत मातेची सेवा करण्याच्या हट्टा पायी या माऊलीचे मातृत्व इंग्रजांच्या अत्याचारामुळे हिरावून गेले. अंमळनेर येथील शासकीय कार्यालयाची जाळपोळ या तत्कालीन शासनद्रोही गुन्ह्याकरिता साडेसहा वर्षे व मार्शल लॉ भंग या गुन्हा करता साडेसात वर्षे अशी एकूण १४ वर्षाची तुरुंगवासाची शिक्षा त्यांना सुनावण्यात आली. भारतीय स्वातंत्र्यलढ्यात १४ वर्षे तुरुंगवासाची शिक्षा झालेल्या लीलाताई या भारतातील पहिल्याच महिला असाव्यात ऑगस्ट १९४२ पासून त्यांचा प्रवास धुळे तुरुंग ,ठाणे तुरुंग येरवडा तुरुंग असा झाला."

येरवडा तुरुंगातील पलायनानंतर लीलाताई सुद्धा भूमिगत होत क्रांतिसिंहाच्या चळवळीत पतीच्या खांद्याला खांदा भिडवत प्रतिसरकार चळवळीत तुफानी सेनेच्या महिला सैनिकांची सेनानी म्हणून नेतृत्व करू लागल्या. १९४६ पर्यंत उत्तमराव व लीलाताई यांच्या नावे असलेले सरकारी सर्व वॉरंट रद्द होईपर्यंत या जोडप्याने भूमिगत राहून महाराष्ट्रभर सामाजिक क्रांती पेटवत ठेवण्याचा प्रयत्न केला. नंतर हे सर्च वॉरंट रद्दबादल झाल्यानंतर संपूर्ण महाराष्ट्रभर या उभयतांचे लोकसत्कार झाले. अशाप्रकारे लीलाताई यांनी स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर काळात महत्त्वपूर्ण अशी कामगिरी केली आहे स्वातंत्र्योत्तर कालखंडामध्ये त्यांनी सामाजिक ,शैक्षणिक व राजकीय स्वरूपात कार्य केलेले आहे.

अनुसया काळे-:या स्वातंत्र्य संग्रामातील एक महत्त्वपूर्ण महिला क्रांतिकारक होत्या. त्यांनी स्वातंत्र्य चळवळीत सक्रिय सहभाग घेतला आणि ब्रिटिश सत्तेविरुद्धच्या विविध आंदोलनांमध्ये भाग घेतला. त्यांच्या योगदानामुळे महिलांच्या स्वातंत्र्य संग्रामातील सहभागाची महत्त्वपूर्ण भूमिका समोर आली. १९५२ मध्ये त्या भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या सदस्या नागपूर येथून भारतीय संसदेच्या कनिष्ठ सभागृह लोकसभेवर निवडून गेल्या. १९५७ मध्ये त्या दुसऱ्या लोकसभेच्या सदस्या म्हणून पुन्हा निवडून आल्या . १९४८मध्ये त्या अखिल भारतीय महिला परिषदेच्या अध्यक्षा होत्या.अनुसूयाबाई काळे यांनी मध्य प्रदेशात आदिवासींसाठी आणि महिलांच्या हक्कांना मान्यता देण्यासाठी काम केले. त्यांचे वडील वकील आणि चित्पावन ब्राह्मण होते, त्यांची आई त्यांची दुसरी पत्नी होती. १९१६ मध्ये त्यांचे लग्न पी.बी. काळे यांच्याशी झाले, जे एक विधुर होते. १९२८ मध्ये अनुसूया यांची मध्य प्रांत विधान परिषदेची सदस्य आणि महिला तुरुंग निरीक्षक म्हणून नियुक्ती झाली आणि पुढच्या वर्षी त्या आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेत सामील झाल्या आणि आंतरराष्ट्रीय व्हिटली कामगार आयोगासह मध्य प्रांतांचा दौरा केला. १९३० मध्ये त्यांनी विधान परिषदेचा राजीनामा दिला आणि पुन्हा गांधीजींसोबत मध्य प्रांतांमध्ये प्रवास केला, अस्पृश्यतेविरुद्ध मोहीम राबवली. १९३५ मध्ये त्या नागपूर काँग्रेस समितीच्या अध्यक्षा होत्या आणि १९३६ मध्ये मोहपा येथे झालेल्या मध्य प्रांत हरिजन परिषदेचे अध्यक्षपद भूषवले. १९३७ मध्ये त्या मध्य प्रांत आणि बेरार

विधानमंडळावर निवडून आल्या आणि नंतर उपसभापती झाल्या..काही काळानंतर एका शैक्षणिक निरीक्षकाला एका तरुणीवर बलात्कार केल्याबद्दल दोषी ठरवण्यात आले, त्यांना शिक्षा सुनावण्यात आली, परंतु काँग्रेसच्या एका मंत्र्याने त्यांची सुटका केली. या प्रकरणाची चौकशी करण्यासाठी अनुसूया यांना चौकशी आयोग नेमण्यात यश आले; त्यात निरीक्षकाविरुद्ध निकाल लागला आणि मंत्र्यांना राजीनामा द्यावा लागला. १९३७ मध्ये अनुसूया यांनी अखिल भारतीय महिला परिषदेला महिलांच्या राजकीय तसेच सामाजिक समस्या हाताळण्यास भाग पाडले. १९४२ मध्ये त्यांनी सरकारविरोधी कारवायांमध्ये दोषी ठरलेल्या सात गोंड लोकांना फाशीपासून वाचवण्याचे काम केले आणि आदिवासींचे भविष्य सुधारण्यासाठीही प्रयत्न केले. १९५२ .मध्ये त्या लोकसभेवर निवडून आल्या.

इंदुमती पाटणकर (इंदुताई)-: ह्या एक स्वातंत्र्य सेनानी व सामाजिक कार्यकर्त्या होत्या. त्या कासेगाव, महाराष्ट्र येथील होत्या. इंदुताईने १०-१२ वर्षाच्या असतानाच काँग्रेसच्या प्रभात फेरींमध्ये भाग घ्यायला सुरुवात केली, व स्वातंत्र्यता आंदोलनातील नेत्यांची मदत केली. त्यांनी राष्ट्र सेवा दल येथे जायला सुरुवात केली. १९४२ रोजी इंदुताईने वयाच्या १६ व्या वर्षी त्यांचे घर सोडले व स्वातंत्र्य आंदोलनात भाग घेतला. त्यांनी महिलांना संघटित केले व राष्ट्र सेवादलाचा प्रसार केला. त्यांने १९४३ मध्ये 'प्रति सरकार'च्या गुप्त आंदोलनात भाग घेतला व सेनानींना दारुगोळा पोचवण्याचे काम केले. इंदुताईने १ जानेवारी १९४६ला क्रांतिवीर बाबूजी पाटणकर, जे नाना पाटील यांच्या 'प्रति सरकार'च्या आंदोलनात सहभागी होते, त्यांच्याशी लग्न केले. दोघेही प्रति सरकारचे अग्रगण्य कार्यकर्ते होते. इंदुताई व बाबूजी हे दोघेही सोशालिस्ट पक्षाचे सदस्य झाले. पक्षातील वैचारिक व राजनैतिक मतभेदामुळे ते अरुणा असफ अली यांचा सोशालिस्ट पक्ष (मार्क्सवादी - लेनिनवादी) ह्यामध्ये सामील झाले. १९५२ साली ते दोघे साम्यवादी झाले. साम्यवादी पक्षाच्या कामांमध्येपण त्या सक्रिय होत्या. इंदोली बरोबर अता कासेगावही साम्यवादी चळवळीचे केंद्रस्थान झाले होते. तिने सतत महिला, शेतकरी व कामगाराच्या अधिकारांसाठी चळवळी चालवल्या. तिने परित्यक्त महिलांच्या संघर्षाला आघाडी दिली. ती चळवळ १९८८ पासून सातारा, सांगली, कोल्हापूर येथे सुरू आहे. इंदुताईने दलित नेतृत्व चळवळीलापण नेतृत्व दिले. १५ जुलै २०१७ रोजी त्यांचे निधन झाले.

अवंतिकाबाई गोखले-:भारताच्या स्वातंत्र्य आंदोलनाच्या इतिहासात गांधींची पहिली भारतीय शिष्या म्हणून अवंतिकाबाई गोखले ओळखल्या जातात. अवंतिकाबाईंनी चंपारण्यातील सत्याग्रहापासून गांधीजींना साथ दिली. स्त्रियांच्या व्यक्तिविकास व सबलीकरणासाठी त्यांनी गिरगावात 'हिंद महिला समाजा'ची स्थापना केली तसेच गिरणी कामगार स्त्रियांसाठी भारतात प्रथमच पाळणाघरे सुरू केली. याशिवाय अस्पृश्य समाजात सुधारणा घडवून आणण्यासाठी प्रयत्नही केले. १९३० व ३२ सालच्या मिठाच्या सत्याग्रहात मुंबईतून शेकडो स्त्रिया सामील झाल्या. त्याचे श्रेय अवंतिकाबाईंनाच जाते. स्त्रियांची सर्वागीण उन्नती होण्यासाठी त्यांना एकत्र आणून त्यांचा व्यक्तिविकास व सबलीकरण व्हावे यासाठी शिक्षण देणे बाईंना आवश्यक वाटले. त्यासाठी त्यांनी गिरगावात 'हिंद महिला समाजा'ची स्थापना केली. या समाजाच्या त्या स्वत: ३१ वर्षे अध्यक्ष होत्या.मुंबई महानगरपालिकेच्या त्या काही काळ सदस्या होत्या.त्यावेळी आपल्या मतदारसंघातील प्रश्न व ठराव मांडून त्यांनी महापालिका दणाणून सोडली. एक नि:स्पृह, स्पष्टवक्ती, अनुशासनप्रिय कार्यकर्ती म्हणून स्वातंत्र्यलढ्याच्या इतिहासात त्यांचे मोलाचे योगदान आहे. १९१९ मध्ये नाशिकमधल्या एका सभेत अवंतिकाबाईंचे भाषण ऐकून लोकमान्य टिळक प्रभावित झाले आणि ते उत्स्फूर्तपणे म्हणाले, ''महाराष्ट्राची सरोजिनी आता तयार झाली आहे.''

**समारोप-:**

भारतीय स्वातंत्र्यलढा हा सर्वांच्या त्यागाचा बलिदानाचा लढा होता समाजातील प्रत्येक समाज घटकाचे त्याच्यामध्ये योगदान दिसून येते. भारतीय स्वातंत्र्य लढ्यात फक्त उच्चवर्णीय वरिष्ठ किंवा फक्त पुरुषांनीच किंवा विशिष्ट भागातीलच लोकांनी योगदान दिले होते असे नाही तर देशभरातील सर्व विभागातून लोकांनी स्वातंत्र्य आंदोलनात योगदान दिल्याचे दिसते. त्यातीलच एक भाग म्हणजे महाराष्ट्र होय आणि या महाराष्ट्रामधील असंख्य लोकांनी देशाच्या स्वातंत्र्यावर लढ्यामध्ये आपल्या प्राणांची आहुती दिली आहे. भारतीय स्वातंत्र्य आंदोलनामध्ये महाराष्ट्रातून सहभाग घेणाऱ्या असंख्य महिला कार्यकर्त्या असल्याचा दिसतात पण त्यांनी देशाच्या स्वातंत्र्य आंदोलनामध्ये दिलेल्या योगदानावर अद्यापही प्रकाश टाकण्यात आलेला नाही सदर शोधनिबंधातून अनुसया काळे ,काशीताई कानिटकर, यमुनाताई भावे, लीलाताई पाटील, इंदुताई पाटणकर, अवंतिकाबाई गोखले यासारख्या महिलांनी स्वातंत्र्य आंदोलनात दिलेल्या योगदानावर प्रकाश टाकण्यात आला आहे. या महिला स्वातंत्र्यसेनानींबरोबर सत्यभामा कुवळेकर, दुर्गाबाई देशमुख यासारख्या अनेक स्त्रियांनी भारतीय स्वातंत्र्य आंदोलनामध्ये योगदान दिल्याची नोंद आहे. त्यापैकी काही निवडक स्त्रिया म्हणून सदर स्त्रियांची निवड करण्यात आली आहे. आणि त्यांच्या कार्यावर व त्यांच्या स्वातंत्र्य आंदोलनातील योगदानावर प्रकाश टाकण्यात आला आहे.

थोडक्यात भारतीय स्वातंत्र्यलढा हा सर्वसमावेशक लढा होता यामध्ये कोणत्याही प्रकारचा धर्म वंश जात लिंग भेद नसल्याचे दिसते.

**संदर्भ-:**

१. ३ ऑगस्ट २०१३ दैनिक लोकसत्ता, गांधीजींच्या पट शिष्य अवंतिका बाई
२.१३ डिसेंबर २०२१ ( शारदाबाई गोविंदराव पवार अध्यासन केंद्र, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर, आयोजित व्याख्यानमाला) श्री.प्रसाद कुलकर्णी.
३.डॉ.बा.अ.देशपांडे : महाराष्ट्राच्या कर्तृत्वशालिनी, पुणे १९९४
४. मेघा नानीवडेकर महाराष्ट्रातील स्त्री चळवळीचा मागोवा, प्रतिमा प्रकाशन पुणे, १९८८.
५. डॉ. इंदुमती नाईक - एक क्रांतीकारी, मालती प्रकाशन मानगाव, २००४
६. रोहिणी गव्हाणकर : भारतीय महिला एवं आजादी की लढाई, मुंबई गांधी स्मारक निधी, मुंबई १९९८